# पुणे महानगरपालिका

## मराठी माध्यम करार पद्धतीवरील शिक्षक भरती जाहिरात

शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५

- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका संचलित मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी सन २०२५-२६ करिता तात्पुरत्या स्वरुपात केवळ सहा महिनेपेक्षा कमी कालावधीकरिता दरमहा एकवट मानधन रक्कम रुपये २००००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वर करार पद्धतीवरील इंग्रजी माध्यम प्राथमिक शिक्षक या पदाकरिता निवड, प्रतीक्षा यादी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे नेमणूक करण्यात येणार आहे.
- विहित करण्यात आलेली शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचे विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीचे अर्ज, गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या प्रमाणित स्वयंसाक्षांकित, छायांकित प्रतीसह शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका कार्यालय कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५ येथे जाहिरात प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ५ दिवसापर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेपर्यंत हस्त पोहोच स्वीकारण्यात येतील.पोस्टाने / टपालाने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांनी त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत घेवून यावीत.

शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व प्राधान्यक्रमाने खालीलप्रमाणे निश्चित केली जाईल.

१) इयत्ता १ली ते १२ वी मराठी माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड. मराठी माध्यमातून उत्तीर्ण.
२) इयत्ता १ली ते १० वी पर्यंत मराठी, १२वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड. मराठी माध्यमातून उत्तीर्ण
३) इयत्ता १ली ते १०वी मराठी अथवा इतर माध्यमातून व १२वी मराठी माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड. मराठी माध्यमातून उत्तीर्ण
४) इयत्ता १ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड. मराठी माध्यमातून उत्तीर्ण.
५) शिक्षक पात्रता परीक्षा, अभियोग्यता (सीटीईटी/ टीईटी) चाचणीच्या गुनानुक्रमे उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्राधान्य क्रमाने तयार करण्यात येईल

**एकूण पदे- २१३**
**९०% प्रमाणे एकूण पदे**

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एससीबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २० | १० | ९ | ० | ० | २ | ४८ | १९ | ० | ६१ | १९१ |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारानुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती-**

**वयोमर्यादा -** (अ) वयोमर्यादा ही जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांका दिवशीपर्येतची गणली जाईल.

(ब) सर्वसाधारण खुल्या गटासाठी शासकीय नियमानुसार कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील, अपंगांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. शैक्षणिक पात्रता उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असणे आवश्यक असून गुणवत्ता धारक अर्जदारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

(क) अर्ज करताना उमेदवारांनी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची (इ.१०वीचे प्रमाणपत्र) स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१) मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचा दाखला अथवा जातवैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२) महिला विवाहित असल्यास , विवाह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
३) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
४) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित पात्रता धारण न करणारा आढळल्यास , गैरवर्तन, दबावतंत्र इ. करताना आढळल्यास उमेदवारी अथवा निवड रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
५) अर्जदाराने आपले अर्ज जाहिरातीमधील विहित नमुन्यानुसार निश्चित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे आवश्यक आहे. सदर पद हे पूर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाचे करार पद्धतीवर ६ महिनेपेक्षा कमी कालावधीसाठी असल्याने या पदावर उमेदवारास प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.
६) अपूर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविले जातील, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
७) शासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना आहेत व राहतील.
८) विहित मुदतीनंतर व अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
९) अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता,जातीचा दाखला इ.आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. सत्यप्रती जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
१०) अर्ज सादर करताना उमेदवार यांनी त्यांचे सर्व मूळ प्रमाणपत्रे पडताळणी करिता उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे.
११) उमेदवारांनी अर्जामध्ये मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
१२) वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकामी मोबाईल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
१३) टपालाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१४) उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्यास अन्य ठिकाणी कोणतीही सेवा / नोकरी करता येणार नाही.

महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका